संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
16 JUL 2026
प्राप्त झाले सही....

**सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करणेबाबत.**
**श्री. शैलेंद्र गोविंदराव पाटील, उपसंचालक.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:- संलेको-२०२६/ई-१६८१७८४/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:-१३.०७.२०२६.

**संदर्भ:-**

१. वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको-२०२५/प्र.क्र.१०४/कोषा.प्रशा-२, दिनांक ०५.०६.२०२५.
२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे आदेश क्र.रा.मं/आस्था-२/२०३८, दिनांक ०९.०६.२०२५.
३. श्री. शैलेंद्र पाटील यांचे दिनांक ०९.०६.२०२५ रोजीचा विनंती अर्ज.
४. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-३/मविलेसे (राप)/प्रतिक्षाधीन/०६/२०२५/१५८३, दिनांक १०.०६.२०२५.
५. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२५/प्र.क्र.५१/कोषा.प्रशा-२, दिनांक १९.०६.२०२५.
६. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे आदेश क्र. सहसंलेको / पुणे / आस्था-३/मविलेसे(राप)/कार्यमुक्त-श्री.शै.गो.पाटील / ०६ / २०२५ / १६८४४, दिनांक २०.०६.२०२५.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश क्र.जिपछ.सं/विवि/आस्था-८/कावि/२०२५/३३०, दिनांक २३.०६.२०२५.
८. संचालनालयाचे आदेश क्र.संलेवको/प्रशा-राप/का-६/रजा/शै.गो.पाटील/४.२६५४८, दिनांक १३.०४.२०२६.
९. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१.
१०. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६.
११. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेवको / प्रशा-राप / का.६ /स.प्र.का/श्री. शै.गो.पाटील/०४.२६/५९६/४७९/२१५७, दिनांक २३.०४.२०२६.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील श्री. शैलेंद्र गोविंदराव पाटील हे लेखा अधिकारी (वर्ग-१), राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे या पदावर कार्यरत असताना, संदर्भाधिन वित्त विभाग शासन आदेश दिनांक ०५.०६.२०२५ अन्वये लेखा अधिकारी (वर्ग-१), राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे या पदावर श्री. वैजनाथ भोजाजी आव्हाड, सहायक संचालक यांना अंशत: बदलीने सुधारीत पदस्थापना देण्यात आली.

२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संदर्भाधिन दिनांक ०९.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री. पाटील यांना दिनांक ०९.०६.२०२५ (म.पू.) रोजी त्यांचे कार्यालयातून कार्यमुक्त करुन श्री. आव्हाड यांना दिनांक ०९.०६.२०२५ (म.पू.) रोजीपासून सदर कार्यालयात रुजू करुन घेण्यात आले.

३) श्री. पाटील यांनी संदर्भाधिन दिनांक ०९.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांना सदर कार्यालयात प्रतिक्षाधिन अधिकारी म्हणून रुजू होत असून, रुजू करुन घेण्याची विनंती केली.

४) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे दिनांक १०.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री. पाटील यांना दिनांक ०९.०६.२०२५ (म.पू.) रोजी रुजू करुन घेण्यात आले.

५) संदर्भाधिन वित्त विभाग, शासन आदेश दिनांक १९.०६.२०२५ अन्वये श्री. पाटील यांची मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर या पदावर प्रशासकीय बदलीने पदस्थापना करण्यात आली.

६) श्री. पाटील यांना प्रशासकीय बदलीच्या पदावर हजर होण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे दिनांक २०.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये दिनांक २०.०६.२०२५ (म.नं.) रोजी त्यांना कार्यालयातून कार्यमुक्त करण्यात आले.

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांचे दिनांक २३.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री. पाटील यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर या पदावर दिनांक २३.०६.२०२५ (म.पू) रोजीपासून रुजू करुन घेण्यात आले.

८) श्री. पाटील हे पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असताना दिनांक १८.०६.२०२५ ते दिनांक २०.०६.२०२५ या कालावधीत ०३ दिवसाची अर्जित रजा उपभोगली आहे. सदर रजा संचालनालयाच्या दिनांक १३.०४.२०२६ रोजीच्या आदेशान्वये मंजूर करण्यात आल्या आहेत.

९) श्री. पाटील यांना दिनांक ०९.०६.२०२५ ते दिनांक २२.०६.२०२५ पर्यंत एकूण १४ दिवस म्हणजेच नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. सदर कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून नियमित करणे आवश्यक आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.०९.०६.२०२५ ते दि.१३.०६.२०२५ | ०५ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे कार्यालयात कार्यरत. |
| दि.१४.०६.२०२५ ते दि.१५.०६.२०२५ | ०२ | शनिवार व रविवारची साप्ताहिक सुट्टी |
| दि.१६.०६.२०२५ | ०१ | नैमित्तीक रजा |
| दि.१७.०६.२०२५ | ०१ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे कार्यालयात कार्यरत. |
| दि.१८.०६.२०२५ ते दि.२०.०६.२०२५ | ०३ | अर्जित रजा |
| दि.२१.०६.२०२५ ते दि.२२.०६.२०२५ | ०२ | शनिवार व रविवार साप्ताहिक सुट्टी |
| एकूण | १४ | |

१०) यास्तव, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) व (जी) तसेच, शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७/सेवा-६, दिनांक ०३.०३.२०१६ मधील तरतूदींच्या अधीन राहून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील श्री. शैलेंद्र गोविंदराव पाटील यांचा दिनांक ०९.०६.२०२५ ते दिनांक २२.०६.२०२५ रोजीपर्यंतच्या एकूण १४ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर प्रतिक्षाधिन कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.अ. भसारकर
२३.०६.२०२५.

**(अ. अ. भसारकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१) सहसचिव, मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) महोदयांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*
५) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई,*
६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे, *
७) श्री. शैलेंद्र गोविंदराव पाटील, उपसंचालक*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)